JYOTI E...
Nehru...
P... 411018.
2 JAN 1990
Inward No. 247

शिक्षण मंडळ कार्यालय,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - 18

क्र. शिक्षण/प्रशा/2/१२०६/89,
दिनांक : २०/१२/८९

प्रति,

मुख्याध्यापिका/मुख्याध्यापक,

ज्योति इंग्लिश स्कूल
नेहरूनगर पिंपरी

विषय : मान्य खाजगी प्राथमिक शाळांना नवीन तुकड्या उघडण्यास मान्यता देणेबाबत 1989/90.

संदर्भ : मा. शिक्षण उपसंचालक यांचेकडील दि. 12/12/89 चे पत्र.

2/- मा. शिक्षण उपसंचालक यांचेकडील उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये शाळेच्या मान्यताबाबत माहिती प्राप्त झाली आहे. खाली नमूद केलेल्या इयत्तांच्या जादा तुकडीस/नैसर्गिक वाढीच्या वर्गास जून 1989 पासून परवानगी देण्यात येत आहे.

| अ. न. | शाळेचे नाव | इयत्ता जादा तुकडी/नैसर्गिक वाढ | शेरा |
|---|---|---|---|
| | ज्योति इंग्लिश स्कूल | १ली ते ७वी प्रत्येकी १ जादा तुकडी | विनाअनुदान |

वरील जादा तुकड्यांची चालू वर्षाच्या अंदाजपत्रकात तरतूद करण्याची व्यवस्था करावी. तसेच सदर वर्गाकडून सरासरी हजेरीची अट पूर्ण झाली पाहिजे.

प्रशासन अधिकारी,
शिक्षण मंडळ,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - 18.

B.M. 24/3. 5:30 PM

जा क्र माध्य-३/ / मा.शा./मान्यता/पुणे ५
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १,
यांचे कार्यालय.
दिनांक :- २६/ ३ /१९९६

प्रति,
सचिव,
ज्योति एज्युकेशन सोसायटी,
पिंपरी, पुणे-१८

विषय :- सन १९९५-९६ या शैक्षणिक वर्षात नवीन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबा

संदर्भ :- शासन पत्र क्रमांक: एसएसएन -१०९५ /५८८/मा शि-१, दि. २७ ऑक्टोबर १९९५

शासनाने संदर्भिय पत्रान्वये आपल्या संस्थेला नवीन माध्यमिक शाळा परवानगी देण्यावर शासनाने घातलेल्या सर्वसाधारण बंदाला अपवाद करून खालील दर्शविलेल्या ठिकाणी इयत्ता व माध्यमातून जून १९९५-९६ पासून ~~विना अनुदान तत्वावर~~ /कायम विनाअनुदान तत्वावर "विशेष बाब म्हणून नवीन माध्यमिक शाळा, माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींची तसेच नमुद केलेल्या अटींची पुर्तता करण्याच्या शर्तीवर परवानगी देण्यात येत आहे.

१] या नवीन माध्यमिक शाळांना [ इंग्रजी माध्यमाव्यतिरिक्त ] शासन निर्णय शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक एसएसएन-१०८८/१६६९ एन,माशि-१, दिनांक १०/२/८९ अन्वये विहित केलेल्या नवीन सुत्रानुसार अनुदान अनुज्ञेय होईल.

२] सदर माध्यमिक शाळांना शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशाचे [ उदा. विद्यार्थी प्रवेशाबाबत तसेच माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी [ सेवेच्या शर्ती ] नियमावली १९८१ चे इ. काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

३] सदर संस्थांची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

४] इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळांसाठी भविष्य काळात शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही व आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी [ ई. बी. सी ] फी च्या परताव्याची मागणी करण्यात येणार नाही. अशा आशयाचे संस्थेच्या अध्यक्षाचे सहीचे लेखी हमीपत्र या कार्यालयाकडे पाठविण्यात यावे.

५] जादा उघडण्यात आलेल्या तुकड्यातुन खात्याने पाठविलेले प्रवेश प्राधान्य देण्यात यावेत. तसेच प्रवेशाच्यावेळी विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारची देणगी स्विकारण्यात येवू नये.

६] महाराष्ट्र शैक्षणिक संस्था [ प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फीज ] कायदा १९८७ अन्वये कोणत्याही प्रकारची देणगी/वर्गणी विद्यार्थ्यांकडून जमा करण्यात येवू नये.

७] माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी [ सेवेच्या शर्ती ] नियमावली १९८१ अन्वये आखून देण्यात आलेल्या नियमानुसार शाळेचे कामकाज करण्यात येईल.

८] संस्थेने मान्य प्रशिक्षित कर्मचारी वर्ग तसेच १०० बिंदू रोस्टरप्रमाणे कर्मचारी वर्ग नियुक्त करण्यात येईल.

९] शिक्षक/कर्मचारी संच शिक्षणाधिकारी [ माध्य.] यांचेकडून मंजुर करून घेण्यात येईल.

१०] माध्यमिक शाळा संहिता कलम ८३ नुसार सर्व प्रकारचे शालेय रेकॉर्ड अद्यावत व परिपूर्ण ठेवण्यात येईल.

११] शालेय वातावरण, इमारत प्रयोगशाळा, इ. बाबी नियमानुसार व आवश्यक त्या सुविधासह ठेवण्यात येतील.

१२] माध्यमिक शाळा संहिता कलम ४९,३ अन्वये मा. शिक्षण संचालक, यांसी पूर्व परवानगी शिवाय जादा फी आकारणीत येणार नाही

मुंबई

## इतर अटी

१] संबंधित संस्था^सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० गर केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत आहे.

२] संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.

३] सदर संस्थेने चालविलेल्या शाळांपैकी एखादया शाळेची मान्यता काढून घेतली नाही. संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत. अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

वरील बाबीपैंकी एक जरी बाब आपल्या संस्थेच्या विरोधात असल्यास दिलेली परवानगी आपोआप रद्द झाल्याचे समजण्यात येईल.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १) | ज्योति एज्युकेशन सोसायटी, पिंपरी, पुणे | पिंपरी पुणे-१८ | आठवी जून ८५ पासून | इंग्रजी |

आपल्या शाळेला खात्याची प्रथम मान्यतेसाठी शाळा संहिता नियमावली ३.१.अ नुसार शाळा सुरू झाल्यापासून एक महिन्याचे आत विहीत प्रपत्रात अर्ज करणे आवश्यक आहे. तसेच मंडळाची प्रथम मान्यता करिता महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या विभागीय मंडळाने संस्थांना मान्यता देण्याची पध्दती मधील नियम १ ते १५ पर्यंत विहीत केलेल्या नियमाप्रमाणे प्रपत्रात अर्ज करावा.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१,

प्रतिलिपी,

१] शिक्षणाधिकारी [ माध्य.] जिल्हा परिषद, पुणे.
आवश्यक त्या कार्यवाही करता अग्रेषित,

त्यांनी वरील नवीन शाळेस तात्काळ भेट देऊन पत्रात नमूद केलेल्या अटी व बाबी संस्था पूर्ण करते किंवा नाही याची तपासणी करुन अहवाल त्वरित या कार्यालयात पाठवावा. तसेच संस्थेविरुध्द तक्रारी व गैरव्यवहाराची उदाहरणे आपल्या कार्यालयात प्राप्त झाले असल्यास त्या विषयी सविस्तर अहवाल या कार्यालयात सादर करावा. नवीन माध्यमिक शाळेस प्रथम मान्यता देण्याबाबत कार्यवाही तात्काळ करावयाची असल्याने शाळेची वर्ग - २ पेक्षा कमी नसणाऱ्या अधिकाऱ्यांकडून तपासणी करुन आपल्या अभिप्रायांसह तपासणी अहवाल त्वरित या कार्यालयास पाठविण्याची व्यवस्था करावी.

२] मा. उपसचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई - ३२,

३] मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे - १, यांना सविनय सादर,